# महात्मा गांधीचींचे आर्थिक विकासविषयक विचार आणि सद्यस्थिती

**प्रा.संजय ठिगळे,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख भारती विद्यापीठाचे,मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,कडेगाव(सांगली)

---

भारताने नुकतीच स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण केली तर महात्मा गांधीजींचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करून दुसरा टप्पा गाठला आहे. सध्याचे युग माहिती तंत्रज्ञानाचे डिजिटल यंत्रणेचे असल्यामुळे आपण एका वेगळया विश्वात आपण वावरत आहोत. जागतिक महासत्तेच्या स्पर्धेत आम्ही आता आम्हाला सिद्ध करण्याच्या प्रयत्नात आहोत. असे असले तरी आर्थिक न्याय आणि आर्थिक समानता याला महत्व देणारे,शांतीचा संदेश देणारे, अहिंसेला प्राधान्य देऊन स्वावलंबनाचा अंगीकार करणारे आणि श्रम प्रतिष्टा महत्वाची मानणारे महात्मा गांधी हे शाश्वत विकासाचा कानमंत्र देणारे अर्थतज्ञ होते असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. सध्याची प्राप्त परिस्थितीत त्यांचा अहिंसा आणि शांतीचा विचार विकासाची प्रक्रिया गतिमान करणारा असून त्याची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे अन्यथा देशाचा होणारा भौतिक विकास भकासपणाकडे घेऊन जाईल.

**कळीचे मुद्दे:** महात्मा गांधीजी – आर्थिक विचारसरणी- खेड्याकडे चला – २१ वे शतक- शाश्वत विकास – सद्यस्थिती

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या जवळपास ७५ वर्षाच्या काळात देशात फार मोठे बदल झाले. शेती, उद्योग, व्यवसाय अशा विविध क्षेत्रात प्रगती केली.शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातसुद्धा अनेक घडामोडी घडल्या.भारतात हरितक्रांती पासून ते धवल क्रांतीपर्यंत आणि निलक्रांती पासून ते माहिती व तंत्र ज्ञानाच्या क्षेत्रापर्यंत ज्या क्रांत्या झाल्या त्यास विकास पर्व म्हणून ओळखले जाते. मात्र एक गोष्ट आपणास विसरून चालणार नाही या विकासाचा पाया महात्मा गांधीजीनी रचला होता. गांधीजीनी खेड्याकडे चला हा विकासमंत्र दिला आपण बरोबर उलटे केले आपण शहराकडे आकर्षित झालो.शहराकडे स्थलांतर केले परिणामी शहरे बेसुमार वाढली शहरे अशीच प्रचंड वेगाने वाढली तर खेडी भकास होतील की काय अशी भीती वाटते. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या भूलभूलैयाला बळी पडून आम्ही चंगळवादीजीवनशैलीचा अंगीकार केला. आमच्या विकासाच्या संकल्पना बदलल्या एवढेच नव्हे तर गरजा बदलल्या उत्पादनवाढ करणे ,दरडोई उत्पन्न वाढविणे,राहणीमानाचा दर्जा वाढविण्यात धन्यता वाटू लागली.मात्र शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत आनंद,आरोग्य,संरक्षण याकडे आम्ही डोळेझाक केली.

विकासाच्या या सर्व प्रक्रियेत महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराचे काय झाले याचा चिकित्सकपणे अभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे काळाची गरज आहे. देशाने कात टाकलेली दिसून येते.तरीही शाश्वत विकासाचे प्रश्न तोंड आ वासून उभे आहेत. त्यासाठी इथुन पुढच्या काळात शाश्वत ग्रामीण विकासाच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. महात्मा गांधीजींची आर्थिक विचारसरणी शाश्वत आर्थिक विकासाला चालना देणारी अशीच आहे. त्याकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष करणे फारसे हिताचे नाही आणि शहाणपणाचे तर नक्कीच नाही.खाजगीकरण,उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या कचाट्यातून आपण कसे बसे सावरतोय न सावरतोय तोपर्यंत आम्ही माहिती तंत्रज्ञानाच्या जाळ्यात बऱ्यापैकी अडकलो आहोत आणि त्यातून आता आपली सुटका नाही. विकासाच्या या सर्व प्रक्रियेत आपण गांधीजींच्या स्वप्नातली खेडी कुठे गेली त्यांची अवस्था काय झाली.खेडी बदलली परंतु बदलाच्या प्रक्रियेत काय घडलं अन काय बिघडलं आणि शाश्वत विकासाचे काय झाले याचा जेव्हा आपण चिकित्सकपणे विचार करतो तेव्हा एक गोष्ट लक्षात येते टी म्हणजे श्रमाचे महत्व कमी झालेले दिसून येते किंवा श्रम संस्काराच्या बाबतीत आम्ही कमी पडत आहोत. त्यामुळे अग्रक्रमाने श्रम संस्कार,श्रम संस्कृती आणि त्याचे संवर्धन यावर आपण आपण लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. तोपर्यंत आपल्या देशात श्रमाला महत्व प्राप्त होत नाही तोपर्यंत विकासाच्या पोकळ गप्पा मारण्यात फारसा अर्थ नाही.

श्रम संस्कार म्हणजे अगदी हातात झाडू टोपली घेतली पाहिजे असे नाही किमान आपली कामे आपण करायला शिकलो तरी भरपूर झाले. त्यांची सुरवात लहानपणापासूनच झाली पाहिजे.देशात राष्ट्रीय सेवा योजना गेली

पाच दशकाहून अधिक काळ कार्यरत आहे.राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक गावे दत्तक घेण्याचे कार्य आव्हाहापणे सुरु आहे. ग्रामस्वच्छता अभियानापासून ते अगदी हागणदारीमुक्त गांव योजनेपर्यंत आणि एडस जनजागृती पासून ते डिजिटल साक्षरते पर्यंतची अनेक विकासाभिमुख कार्ये दत्तक खेड्यात केली जात आहेत. वास्तविक राष्ट्रीय सेवा योजनेच्या माधमातून राबविली जाणारी श्रम संस्काराची चळवळ म्हणजे महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण खेडी तयार करण्याचे एक माध्यम आहे. महात्मा गांधीजींच्या विचारला चालना देणारी महाविद्यालयात कार्यरत असणारी राष्ट्रीय सेवा योजना अधिक सक्षम करावी लागेल. गांधीजीनी राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही स्वच्छता महत्वाचीमानली.यंत्र संस्कृतीतून आलेली कृत्रिमता (१)
नष्ट झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होणार नाही. तोचतोचपणा आणि त्यातून आलेला निराशावाद नष्ट करण्यासाठी त्यांनी निसर्गाकडे जाण्याचा सल्ला दिला. खेड्याकडे चला अशी हाक दिली. दुर्दैवाने आपण निसर्गाकडे चला याचा अर्थ चुकीचा घेतला. आम्ही निसर्गाकडे गेलो मात्र आपण निसर्गाचे चक्र अभ्यासले शिकलो नाही. याउलट निसर्गाची हानीच करीत राहिलो. परिणामी निसर्गरम्य ठिकाणी आता अस्वच्छतेच्या प्रश्नांने बऱ्यापैकी डोके वर काढलेले दिसून येते. वाढते प्रदूषण त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न गांधीजींच्या विकासाच्या स्वप्नाला मारक ठरु लागले आहेत. आता शाश्वत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतला सर्वात महत्वाचा मुद्दा कोणता असेल तर तो स्वच्छतेचा. अलीकडच्या काळात स्वच्छ भारत सुंदर भारत हे घोषवाक्य अधिक प्रसिद्ध झालेले दिसून येते हे जरी खरे असले तरी त्यावर महात्मा गांधीजीनी सांगितलेला एक राज मार्ग म्हणजे कुठल्याही कामाची सुरवात स्वत:पासनूकेली पाहिजे. मात्र तसे होत नाही.घर ते आपलं आणि रस्ता तो सरकारचा ही जी विचित्र मानसिकता तयार झाली आहे ती बदलण्याची गरज आहे.

आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ आणि दरडोई उत्पन्नात झालेली वाढ आणि राहणीमानाचा दर्जा वाढला यापुरते आपण सिमित राहिलो. भौतिक सुखाच्या मायाजाळात अडकलेल्या माणसाला आर्थिक सुखाचा लागलेला हव्यास शाश्वत विकासाला खीळ घालणारा आणि माणसाला विनाशाकडे घेऊन जाणारा आहे. विकास होत असताना वाढत चाललेली आर्थिक विषमता,दारिद्र्य,उपासमार, सामाजिक असुरक्षितता हे प्रश्न अधिक गंभीर होत चालले आहेत. मानवी चेहऱ्यावरील समाधानाचा आणि हास्याचा आम्ही विचार केलाच नाही.माणसाला फक्त आर्थिक स्वतंत्रपणा हवा असतो असे नाही त्याबरोबरच त्याला शांतता हवी असते. त्यासाठी सत्य आणि अहिंसेचा मार्ग अंगीकारावा लागतो. मात्र आपण काळाच्या ओघात नेमके विकास कशात आहे हेच विसरलो आहोत.त्यादृष्टीने शांतता आणि अहिंसा या बाबतीतील महात्मा गांधीजींचे विचार फार महत्वाचे वाटतो. स्पर्धेवर आधारलेली आणि गळेकापू स्पर्धेला खतपाणी घालणारी अर्थव्यवस्था गांधीजींच्या विचारला मूठमाती देणारी आहे. ग्राहक हेच दैवत म्हणायचे आणि ग्राहकाची वेगवेगळया मार्गांनी लुट करायची हे विकासाला मारक आहे. एवढेच नव्हे तर खरा भारत खेड्यात आहे. असे म्हणणाऱ्या महात्मा गांधीजींच्या देशात खेड्याचा कणा असलेल्या शेतीचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. शेती कसायची असते ही संकल्पना मागे पडून ती विकायची असते हा विचारप्रवाह अधिक जोर धरू लागला आहे.त्याला कारण म्हणजे खेडी स्वयंपूर्ण करण्यात आपणास काही अंशी अपयशी ठरले आहोत. विशेषत: शेतकरी राजा एका (२)
वेगळ्या दुष्टचक्रात अडकलेला दिसून येतो. शेती करण्याशिवाय पर्याय नाही म्हणून तो शेती करतो आहे असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. आर्थिक समता आणि आर्थिक न्याय याबाबतीत आम्ही विषमतेच्या सीमा केंव्हाच ओलांडल्या आहेत. त्यामुळे आर्थिक न्याय आणि आर्थिक समानता या दोन्ही गोष्टीवर अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल. गांधीजींनी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला. मात्र जागतिकीकरणाच्या आणि खाजगीकरणाच्या कचाट्यात अडकलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला आता बाहेर काढण्यासाठी गांधीजींच्या विचाराची गरज आहे.

गांधीजींचा सहकार या शब्दावर आणि माणसाच्या चांगुलपणावर फार विश्वास होता. ग्रामस्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरविण्याठी सहकार माणसाच्या नसानसात भिनला पाहिजे असे गांधीजींना वाटत असे. महात्मा गांधीजी पर्यावरणवादी होते एवढेच नव्हे तर त्यांनी मर्यादित गरजा असण्यावर अधिक भर दिला होता. दुर्दैवाने आपण

आपल्या गरजा अमर्याद करून ठेवल्यात आणि आपल्या गरजांची पूर्तता करण्याएवढी साधनसामुग्री आमच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे शाश्वत विकासाचे अर्थशास्त्र बिघडलेले दिसून येते. विकासाच्या नावाखाली आम्ही एवढे प्रदूषण करून ठेवले आहे की माणसाचा जीव आता गुदमरतोय. आर्थिक विषमतेने मोठ्या प्रमाणावर डोके वर काढलेले दिसून येते एवढेच नव्हे तर विषमता हिच विकासाच्या प्रक्रियेतील डोकेदुखी होऊन बसली आहे. गरीब अधिक गरीब होत चालला आहे तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालला आहे. हे असेच चालत राहिले तर शाश्वत आर्थिक विकासाला फार मोठी खीळ बसेल.

गांधीजीनी आर्थिक विकासाबरोबरच नैतिकतेला महत्व दिले.नैतिक विकास हा तर शाश्वत्त विकासाचा पाया आहे. मात्र अलीकडच्या काळात नैतिकतेची ऐशी की तैशी अशी अवस्था निर्माण झालेली आहे. चंगळवाद आणि भौतिक सुखे हाच विकासाचा मंत्र होऊन बसल्यामुळे न्याय आणि नैतिकता हा विषय बासनात गुंडाळून ठेवला आहे. आर्थिक विकेंद्रीकरण हा विकासाचा महत्वाचा पाया मात्र खाजगीकरणाची मोहीम अधिक बळकट झाल्यामुळे मक्तेदारी मोठ्या प्रमाणावर उफाळून आलेली दिसून येते. याचाच परिणाम म्हणून एका विशिष्ट वर्गाची अर्थव्यवस्थेवरील पकड अधिक मजबूत होत चालली आहे. शाश्वत आर्थिक विकासाची प्रक्रिया करावयाची असेल तर सत्तेचेकेंद्रीकरण टाळावे लागेल. त्याचबरोबरसत्याग्रही पद्धतीने लोकांचे मतपरिवर्तन करावे लागेल.त्याशिवाय तरणोपाय नाही. महात्मा गांधीजी देशी उद्योगांना संरक्षण देण्याच्या बाबतीत नेहमीच आग्रही राहिले.आज २१ व्या शतकात बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे देशी उद्योगांना स्पर्धा करणे जिकीरीचे होऊन बसले आहे. त्यासाठी सरकारला देशी उद्योगाच्या पाठीशी ठामपणे उभारावे (३)

लागेल. देशी उद्योगांना संरक्षण,आर्थिक न्याय,आणि समता त्याचबरोबर खेड्यांचा सेर्वागीण विकास,नैतिक अधिष्ठान,आणि सत्य आणि अहिंसा या सर्व तत्वाचा अंगीकार करणारे आणि त्यासाठी आग्रही राहणारे महात्मा गांधीजी हे खऱ्या अर्थाने अर्थशास्त्रज्ञ होते फक्त गरज आहे ती त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करण्याची.

सन १९०४ मध्ये कायदेशीरदृष्ट्या सुरु झालेली सहकारी चळवळ हेभारताच्या दृष्टीने विकास पर्व होते. स्वातंत्र्यप्राप्तीपासून सावरकरांचे प्राबल्य असणाऱ्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीने आपले पाय खंबीरपणे रोवले त्यामुळेच ग्रामीण भागात सहकारी संस्था या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कणा ठरल्या. जवळपास १२० वर्षाचा प्रदीर्घ काल सहकारी चळवळ पूर्ण करेल.सहकारी चळवळीचा प्रवास नक्कीच थक्क करणारा आहे.भारताने जो काय विकास केला त्याचे श्रेय सहकारी पतपुरवठा संस्थाना द्यावे लागेल. सहकारी संस्था या ग्रामीण विकासाच्या रक्त वाहिन्या बनल्या.कर्ज पुरवठ्याच्या माध्यमातून देशातहरित व धवल क्रांती झाली.कोट्यावधी लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या.दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत झाली. लोकांच्या राहणीमाणाचा दर्जा वाढत गेला. साहजिकच ग्रामीण विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होण्यास मदत झाली. हे आपणास नाकारता येणार नाही. मात्र सन १९९१ नंतर भारतात खाजगीकरण व जागतिकीकरण आले त्याचे काही अनुकूल प्रतिकूल परिणाम दिसून आले. विशेषतःसेवा भाव आणि निष्टा या दोन महत्वाच्या गोष्टीना तीरांजली मिळाली.सहकारातील सेवा भाव संपून त्यामध्ये सत्ता संघर्ष,टोकाचा स्वार्थ बोकाळला. सहकारात भडवेगिरी व बुडवेगिरी प्रवृत्तीने थैमान घातले परिणामी सहकारी संस्थाच्या प्रगतीला अधोगती लागली. एका बाजूला कर्जबुडव्यांची संख्या वाढू लागली तर दुसऱ्या बाजूला कर्ज बुडव्यांना अभय मिळू लागले. त्यामुळे लोकांच्या मनात सहकारी चळवळीविषयी साशंकता निर्माण झालीआहे. चुकीच्या कर्जपुरवठ्याच्या धोरणामुळे सहकारी संस्था अडचणीत आल्या. खरंतर भविष्यात या संस्थाना फार मोठे भवितव्य आहे.मात्र त्यासाठी कालानुरूपबदल करण्याची क्षमता विकसित करावी लागले एवढेच नव्हे तर तुझा माझा तो या पक्षाचा याचा विचार न करता कर्ज बुडव्यांना चाप लावावा लागेल.विश्वासाचे नाते तयार करावे लागेल.राजकारण कमी करून व्यवस्थापनातील त्रुटी दूर कराव्या लागतील. शेतकरी वर्गाला दीर्घ मुदतीची व कमी व्याज दाराची कर्जे द्यावी लागतील.झपाट्याने होणारे डिजिटलीकरण व त्यातील त्रुटींकडे डोळसपणे बघावे लागेल. 'स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर सहकारी चळवळीतसुद्धा 'स्वच्छता अभियान मोहिम राबवावी लागेल त्याशिवाय गांधीजींच्या स्वप्नातील खेडी उभी राहणार नाहीत.